सोमवार, २८ जुलै २०१४
सोलापूर.
दिव्य सिटी

## वसुंधरा महोत्सव | जुन्या वास्तूच्या दुरावस्थेबाबत नाराजीचा सूर



वसुंधरा महोत्सवांतर्गत हेरिटेज वॉक अंतर्गत सोलापुरातील इंद्रभवन इमारतीच्या परिसरात वॉक घेण्यात आला. यावेळी वास्तुविशारद श्वेता कोठावळे व पुष्पांजली काटीकर यांनी पुरातन वास्तुशास्त्राविषयी सविस्तर माहिती दिली.

# हेरिटेज वॉक उपक्रमामधून घेतली वास्तू वैभवाची माहिती

### शहरातील जुन्या वास्तूंना भेटी देऊन करण्यात आली पाहणी

प्रतिनिधी | सोलापूर

एकेकाळच्या वैभवशाली युगाची साक्ष देणाऱ्या सोलापूर शहरातील विविध ऐतिहासिक वास्तूंच्या सध्याच्या दुरावस्थेमुळे सुजाण मान्यवरांची पावले, मनेही क्षणोक्षणी थबकत होती. खंत व्यक्त करीतच हेरिटेज वॉक घेण्यात आला. वसुंधरा महोत्सवांतर्गत शहरातील जुन्या वास्तुवैभवांना भेट देऊन पाहणी करण्याचा उपक्रम हेरिटेज वॉक अंतर्गत रविवारी झाला.

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या इंद्रभवन, नॉर्थकोट, रिपन हॉल आणि लक्ष्मीबाई मार्केट येथील ब्रिटिशकालीन वास्तूंच्या परिसरात हा उपक्रम पार पडला. यात आर्किटेक्ट श्वेता कोठावळे आणि पुष्पांजली काटीकर यांनी देखण्या वास्तूंची निर्मिती, सौंदर्यस्थळे आणि अनुषंगिक माहिती उलगडली. या वास्तूंची सध्याची दुरावस्था समोरच दिसत होती. हा पुरातन ठेवा जपला जावा, असाच सूर उमटत राहिला.

या वेळी डॉ. रवींद्र चिंचोलकर, प्रा. एस. एन. काटीकर, अमोल चाफळकर, बाबूराव पेठकर, उमाकांत आलुरे, रवींद्र पुकाळे, दिवाकर रेळेकर, महेश एवळेकर, रमेश वाघज, महावीर मिराखोर, व्यंकटेश कोंगा आदींसह ज्ञानप्रबोधिनी व कुचन प्रशालेतील विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. सोलापूरच्या पुरातन ठेव्यांची सध्याची अवस्था ही खंत निर्माण करणारी आहे. या वास्तू जपल्या पाहिजेत, अशी खुणगाठ बांधली पाहिजे.

**वटवाघळांच्या निवासस्थानाचेही दर्शन** : रिपन हॉलच्या मागे वड आणि पिंपळाच्या झाडांवर सध्या वटवाघळे हजारोंच्या संख्येने दिसून येतात. हे त्यांचे निवासस्थानच बनले आहे. हेरिटेज वॉक घेताना हे निवासस्थानही पाहण्यात आले. या प्राण्याबाबतची सविस्तर माहिती देऊन प्राणिमित्र भरत छेडा म्हणाले, "हे पक्षी नाहीत तर उडू शकणारे सस्तन प्राणी आहेत. हॉरर चित्रपटांतून अघोरी पद्धतीने या प्राण्यांचे चित्रीकरण झालेय. प्रत्यक्षात हे प्राणी स्वभावाने गरीब आहेत. उलटे टांगलेल्या अवस्थेतच राहतात. वटवाघळांचे संरक्षण करण्याचा हा भाव पुढील पिढीनेही जपावा."

## देखण्या वास्तू, सौंदर्यस्थळांची माहिती उलगडली

### नॉर्थकोट

ही शैक्षणिक वास्तू आहे. या वास्तूच्या उभारणीला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. संपूर्ण बांधकाम बसाल्ट या काळ्या पाषाणापासून व चुन्याचा वापर करून उभारले गेले आहे. भक्कम दगडी भिंती, कमानी हे या वास्तूचे सौंदर्य मानले जाते.

### रिपन हॉल

लॉर्ड रिपन हे भारतमित्र म्हणून ओळखले जात असल्याने त्यांच्या नावावरून भारतात ठिकठिकाणी वास्तू आहेत. सोलापुरातही बॅडमिंटन कोर्ट, क्लबसाठी रिपन हॉल या नावाने वास्तू उभारली गेली. येथे अतिक्रमण खूप वाढले आहे. किमान जागेभोवती कंपौंड तातडीने उभारणे गरजेचे आहे.

### इंद्रभवन : वास्तुशैलीचे उत्तम उदाहरण

ही वास्तू अप्पासाहेब वारद यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या वास्तव्यासाठी १९१२ मध्ये उभारली. ही वास्तू इंडो-बराक वास्तुशैलीचा उत्तम नमुना आहे. सध्या या इमारतीवर ठिकठिकाणी वड, पिंपळ आणि कडुनिंबासारखी झाडे उगवली आहेत. दगडी भिंतींनी ओल पकडली आहे. योग्य आर्थिंग नसल्याने इमारतीवर एकदा वीज पडून काही शिल्पकृतींचे नुकसानही झाले. १९१८ नंतर हरिभाई देवकरण शाळा, कोर्ट, म्युन्सिपाल्टी आदींचे कामकाज होत राहिले.